स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४१२९/को./११/०७/०८

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)

# भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप



कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे



## नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. २३१९-६०२५

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)

## भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक

**• अतिथी संपादक •**

प्रा. डॉ. अरुण शिंदे

**• संपादन सहाय्य •**

प्रा. डॉ. निलेश शेळके । प्रा. डॉ. बळवंत मगदूम । प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ

**पत्रिका संपादक मंडळ**

**• संपादक •**

प्रा. डॉ. नंदकुमार मोरे

**• सदस्य •**

प्रा. डॉ. देवानंद सोनटक्के । प्रा. डॉ. जयवंत दळवी । प्रा. डॉ. सुभाष पाटील

**• प्रकाशक •**

प्रा. डॉ. भरत जाधव

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे,

ता.जि. सातारा ४१५५१९

**• मुद्रक •**

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर.

फोन नं.: ०२३१-२६५४३२९

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. भरत जाधव, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे, ता.जि. सातातरा ४१५५१९ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

Scanned with OKEN Scanner

१०३ डिजिटल माध्यमे आणि मराठी भाषेचे बदलते स्वरूप / प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने ........................ २८६
१०४ पत्रकारिता : भाषिक कौशल्य / डॉ. अनुसया नागनाथ नागीमे ........................ २८८
१०५ 'तृष्णा' या आदिवासी आत्मकथनातील भाषावैभव / प्रा.डॉ. कल्पना डी. गोरले-थोरात ........................ २९०
१०६ लोकसाहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास / प्रा. डॉ. नवनाथ अंगद शिंदे ........................ २९४
१०७ भाषा, बोली आणि संस्कृती सहसंबंध / साधना अरुण खोमणे ........................ २९७
१०८ मराठी भाषा, साहित्य आणि पत्रकारितेचा अनुबंध / डॉ. केशव धोंडिबा टिपरसे ........................ २९९
१०९ 'मोराची बायको' या कथासंग्रहातील व्यक्तिरेखांचा मानसशास्त्रीय अभ्यास / निलम नंदलाल अडसुळे.......... ३०१
११० बालसाहित्य आणि बालगीतांतून प्रकट होणारे भावविश्व / डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार ........................ ३०३
१११ अभिजात मराठीचे लेखन / प्रा.डॉ.प्रवीण चंदनशिवे ........................ ३०६
११२ चित्रपट भाषा : एक अभ्यास / प्रा.डॉ. विठ्ठल पंढरीनाथ लंगोटे ........................ ३०८
११३ आदिवासींच्या 'दंडार' उत्सवातील लोकगीतांमधून आविष्कृत होणारे समाजजीवन /
राजेंद्र विश्वनाथ कुळमेथे, मार्गदर्शक : प्रा.डॉ.संजय केशवराव लाटेलवार ........................ ३१०
११४ अध्यात्मिक शाहिरी : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र / प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ........................ ३१४
११५ मराठी भाषा आणि अन्य भाषांचा परस्परसंबंध / प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील ........................ ३१७
११६ शासकीय कामकाजातील कार्यालयीन भाषा व भाषा धोरण / डॉ. संतोष शहापूरकर ........................ ३२०
११७ मराठी भाषा विकासाची आव्हाने आणि उपाय / डॉ. रविकांत शिंदे ........................ ३२२
११८ मराठी भाषा, साहित्य व खेळ / डॉ. लोहिता माने ........................ ३२६
११९ इंग्रजी भाषांतरित 'फकिरा' कांदबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास / डॉ. वैजयंतीमाला आप्पासाहेब जाधव ....... ३२८
१२० मानवी विकास आणि भाषा उत्पत्ती / प्रांजली सत्यवान क्षीरसागर ........................ ३३१
१२१ मराठी कवितेचा राजकीय परिप्रेक्ष्य / डॉ. बळवंत मारुती मगदूम ........................ ३३५
१२२ मराठी भाषा आणि सोशल नेटवर्किंग /
श्री. गौरीशंकर दत्तात्रय खोबरे, मार्गदर्शक : डॉ. तानाजी अंबादास देशमुख ........................ ३३८
१२३ मराठी भाषा : सध्यस्थिती आणि रोजगाराच्या संधी / प्रा. डॉ. अशोक शेलार ........................ ३४१
१२४ मराठी विज्ञान कथात्मक साहित्यातील प्रयोगशीलता / प्रा. एस. बी. डफळापूरकर ........................ ३४४
१२५ मराठी साहित्याच्या आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या दिशा / प्रा. डॉ. सविता सुनिल केंजळे ........................ ३४६
१२६ 'भिवा फरारी' या कादंबरीचा समाजशास्त्रीय अभ्यास / प्रा. डॉ. मनोज बापुसाहेब तेलोरे ........................ ३४८
१२७ मराठीतील आदिबंध / सुनिता दुधाट, मार्गदर्शक : डॉ. माहेश्वरी गावीत ........................ ३५१
१२८ मराठीतील निसर्गविषयक साहित्य / डॉ. प्रदीप यशवंत पाटील ........................ ३५३
१२९ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय : आंतरविद्याशाखीय संदर्भ / डॉ. प्रवीण लोंढे ........................ ३५६
१३० मानवी विकास आणि भाषा / डॉ. सायली आचार्य ........................ ३६०
१३१ जागतिकीकरण आणि मराठी भाषा / प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर ........................ ३६३
१३२ लोकगीतातील स्त्रियांची भाषा / प्रो. डॉ. सविता अशोक व्हटकर ........................ ३६६
१३३ लोकतत्त्वीय अभ्यासपद्धती : स्वरूप आणि निकषव्यवस्था / डॉ. आप्पासो आनंदा बुडके ........................ ३६९
१३४ लोकदैवतांविषयक मौखिक साहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास / डॉ. सदाशिव पाटील ........................ ३७२
१३५ वचनसाहित्य आणि संविधानिक मूल्ये / प्रा. प्रकाश बाळू नाईक ........................ ३७५
१३६ वाङ्मयीन संस्कृती / सौ. उज्वला सुनिल लांडगे ........................ ३७८
१३७ विद्रोहाची-परिवर्तनाची भाषा / डॉ. विजयकुमार रामदास घोडके ........................ ३८०
१३८ वैचारिक साहित्याचे स्वरूप / डॉ. शशिकला भीमराव रणदिवे ........................ ३८३



Scanned with OKEN Scanner

# मराठी कवितेचा राजकीय परिप्रेक्ष्य

**डॉ. बळवंत मारुती मगदूम**
मराठी विभाग, श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय,
सावळज, ता. तासगाव, जि. सांगली.

## प्रस्तावना

कविता ही भवतालाविषयीची कवीची सहज प्रतिक्रिया असते. त्यामुळे राजकारणासारखा विषय हा काव्यलेखनातून सुटू शकत नाही. त्यातून महाराष्ट्रीयन माणूस हा राजकारण वेडा आहे. पक्षीय भूमिकांची मांडणी, प्रतिपक्षावर हल्ला, कवितेला कवितेने उत्तर, भाषण अर्थपूर्ण होण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न यानिमित्ताने उद्‌धृत केलेल्या कविता व साहित्यविषयक विविध उपक्रमांतील राजकीय हस्तक्षेप पाहिल्या असता राजकारणाचे आणि मराठी कवितेचे नाते किती घट्ट आहे, हे आपल्या लक्षात येते. त्याअनुषंगाने मराठी कवितेचे आणि राजकारणाचे कोणत्या स्वरूपाचे नाते दिसते याविषयीची चर्चा येथे अपेक्षित आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे

१) मराठी कविता आणि राजकारण यांचे नाते कशाप्रकारचे आहे? हे तपासणे

२) तत्कालीन राजकीय घटनांवर राजकीय कवितांचे लेखन झाले आहे काय? याचा शोध घेणे.

३) कोणती राजकीय व्यक्तिमत्त्वे राजकीय कविता लेखनासाठी प्रेरक ठरली आहे काय? याचा शोध घेणे.

४) राजकीय कवितेने भाषिक पातळीवर कोणते प्रयोग केले आहेत का? याचा शोध घेणे.

## गृहीतके

१. मराठी कवितेचा आणि राजकारण यांचा सहसंबंध आहे.

२. राजकीय घटितांच्या अनुषंगाने प्रारंभापासून काव्यलेखन झालेले आहे.

३. उत्स्फूर्तता हा राजकीय कवितेचा प्रधान विशेष आहे.

४. गेयता, यमक, व्यासपीठीकरण यांच्या अतिरेकामुळे राजकीय कवितेचा परीघ सीमित झाला आहे.

## राजकीय कविता

कविता ही कवीची त्याच्या वर्तमानाविषयीची सहज प्रतिक्रिया असते. ही प्रतिक्रिया भाषेतून व्यक्त होत असल्याने कवितेला भाषिककृतीही संबोधले जाते. त्या दृष्टीने पुढील मत विचारात घेता येईल. 'कविता ही भाषिक कृती आहे. त्यामुळे वर्ण, अक्षर, पद, शब्द, वाक्य, ओळ यांची जुळणी व क्रम यातल्या एकरूपतेला महत्त्व असते. अलंकार, प्रतिमा, आदिबंध यांच्यामुळे काव्यभाषेचा एक पट तयार होतो. या पटातच काव्यार्थाचा रूपबंध आकाराला येतो.'[१] असा कवितेचा रूपबंध आकाराला येत असल्याने कवीकडून उत्स्फूर्तता, सहजता यांनी युक्त हे अनुभव उद्‌धृत होऊ शकतात. पण आपल्याकडे कवीचे मुक्त असणे, त्याच्या ठिकाणी प्रतिभा नावाची शक्ती असणे, प्रसंगी त्याचे दैवीकरण करण्यापर्यंत आपला साहित्य व्यवहार आलेला आहे. त्यात मराठीत कविता लिहिणे खूप सोपे मानले जाते. त्याचा उलटा परिणाम काव्यलेखनावर झालेला आहे. कवितेचे व्यासपीठीकरण होण्याबरोबरच गेयता हेच तिचे प्रमुख लक्षण मानले जाऊ लागले आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर राजकारणाने मराठी कवितेकडून कोणत्या गोष्टी आत्मसात केल्या, हे पाहाणेही आवश्यक ठरेल. राजकारण केंद्रवर्ती ठेवून लिहिलेली पूर्णत: राजकीय कविता हा एक भाग आणि त्यातून काही त्रोटक स्वरूपात राजकारणाचे विषय आलेले आहेत, अशी कविता. हा दुसरा भाग. काही अभ्यासक राजकारण केंद्रवर्ती ठेवून लिहिलेल्या कविता वात्रटिका असेही म्हणतात. जशी त्यांचे वात्रटिका हे रूप मान्य केले तरी त्या राजकारणाशी संबंधित असल्याने त्यांना आपण राजकीय कविता म्हणू शकतो. कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, नारायण सुर्वे, वसंत दत्तात्रय गुजर, नामदेव ढसाळ व संजीव खांडेकर यांनीही आपल्या काव्यलेखनातून राजकारण हा विषय हाताळलेला आहे. त्यांच्या कवितेतून एक राजकीय भान व्यक्त होताना दिसते. पण आजच्या राजकीय कवितेने आपल्या पूर्वसुरीचे भान सोडले आहे. याबरोबरच ग्रामीण माणसाचा राजकारणाशी शहराच्या तुलनेत थेट संबंध येत असल्याने ग्रामीण कवितेतही गावच्या राजकारणाच्या अनुषंगाने काव्यलेखन केले आहे. मात्र या ग्रामीण परिवेशातील कवितेने गावोगाव होणारी संमेलने, इथं सादर होणाऱ्या मंचीय कवितेच्या प्रेमात पडून त्या कवितेचा



Scanned with OKEN Scanner

कित्ता गिरवलेला दिसतो.

आता या राजकीय म्हणवल्या जाणाऱ्या कवितेने कविता या वाङ्मयप्रकाराचे म्हणून सांगितले गेलेले सर्व गुण अथवा रूढ मराठीत कवितेते जे गुण आढळताहेत ते राजकीय कवितेत आढळतात का? राजकारणाने कवितेचे सारे गुण घेतले का? असे काही प्रश्न उपस्थित केले तर याचे उत्तर नकारात्मक येईल. कवीची काव्यनिर्मिती हे त्याच्या जगण्याचे उर्ध्वपातन मांडले जाते. मग ही क्रिया राजकीय कवितेत घडते का? कवितेच्या निर्मितीप्रक्रियेच्या अनुषंगाने त्याच्या अनुभवाचे पुनर्गठन होणे अपेक्षित मानले गेले आहे. स्वप्नव्यापार, उत्स्फूर्तता, कवीचे व्यक्तिमत्त्व, त्याची संवेदनशीलता आणि सूक्ष्म निरीक्षण या साऱ्या गोष्टी काव्यनिर्मिती प्रक्रियेत सामावलेल्या असतात. रस, अलंकार, अर्थ, कल्पनाशक्ती, सौदर्य, छंदबद्धता या साऱ्या गोष्टींवर राजकीय कविता तपासली तर त्यामध्ये गोष्टींची वानवा आढळेल. ती गेयता आणि यमक यांच्या अधिक प्रेमात आहेत. तिच्यात काव्य कमी आणि कारागिरी अधिक दिसून येते. याला काही कवी अपवाद ठरत आहेत. पण त्यांची संख्या इतरांच्या तुलनेत खूप कमी आहे. अखेर कमाई (कुसुमाग्रज), निर्वासित चिनी मुलास (अनिल), गांधी मला भेटला (वसंत दत्तात्रय गुजर), नेहरू गेले त्यावेळची गोष्ट (नारायण सुर्वे), धोंड्या न्हावी (विंदा करंदीकर), आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शनी (नामदेव ढसाळ) याशिवाय ग्रामीण आणि दलित या संज्ञेमध्ये मोडणारे जे साहित्य आहे त्यामध्ये खेड्याचे राजकारण, सोयीसुविधा जातीयतेच्या अनुषंगाने लेखन झाले आहे.

अलीकडे संकर्षण कऱ्हाडे यांनी पांडुरंगाला उद्देशून लिहिलेली 'सगळी गावं तुझीच आहेत, तू अर्ज भरून पहावं' मुक्तछंदात लिहिलेली कविता, असे काही अपवाद आहेत. यापूर्वी राजकीय व्यक्तिमत्त्वे केंद्रवर्ती ठेवून संपूर्ण कवितासंग्रह निघाल्याचा इतिहास आहे. ही परंपरा आता क्षीण झाली आहे. आज तत्कालिक कारणांच्या अनुषंगाने दररोज राजकारणातील नवा विषय शोधून गंभीर कविता लिहिण्याऐवजी वात्रटिका करणारी मंडळी अधिक वाढली आहे. ही आजच्या काळाची राजकीय कविता ठरते. मुळात 'कविता जशी व्यक्तिपरत्वे बदलते तशी ती काळाप्रमाणेही बदलते. काळाप्रमाणे समाज बदलत असतो. त्याची संस्कृती, त्याची श्रद्धा व श्रद्धास्थाने बदलत असतात. त्यांच्या अनुभवांचे घटक बदलतात. त्याची अनुभव घेण्याची पद्धतीही बदलते. समाज जी भाषा वापरत असतो ती भाषाही बदलते.'[२] त्यामुळे आजच्या कवितेत आलेले अनुभवविश्व आणि पर्यायाने भाषा ही निश्चितच आजच्या काळाची असते. ती तशी येत असल्यामुळे तिला समकालीनत्व प्राप्त होत असते. जे राजकीय कवितेसाठी अत्यंत आवश्यक असते. रामदास फुटाणे, विशाल मस्के, रघुनाथ सोनटक्के, संजीव शाळगावकर, सुर्यकांत डोळसे, अशोक मिरगे या आणि महाराष्ट्राच्या अनेक छोट्यामोठ्या खेड्यात लिहिलेल्या कवितांचा विचार करता येईल. ज्यांच्या लेखनातून काल चर्चेच्या केंद्रस्थानी असणारा विषय आजच्या लेखनात येतो. या मांडणीला कविता म्हणून काही मर्यादा आहेत. या मर्यादेतच तिचा विचार करावा लागतो.

**राजकारण आणि समाजमाध्यमे**

राजकीय कवितेला मर्यादा पडण्याचे आणखी एक कारण म्हणजे अलीकडे राजकीय मंडळींच्या हाती आलेली whatsapp, instragram, facebook ही समाजमाध्यमे. ज्यातून झऱ्याच्या पाण्यासारखे सतत राजकीय पाणी स्त्रवत असते. हे पाणी आपल्या भांड्यात भरून घेवून ते सर्वदूर पोहचवणे हे कर्तव्य मानणारी मंडळी पक्षाच्या कोणत्याही पोस्टवर अल्पावधीत many time forworded चा टॅग त्याला प्राप्त करून देतात. इतक्या तत्परतेने ह्या गोष्टी प्रस्तुत होतात.

मुळात राजकारण हा खूप संवेदनशील भाग आहे. येथे राजकारणाचे संदर्भ हे दिवसागणिक नव्हे, तर मिनिटागणिक बदलत असतात. विशेषतः हा अनुभव निवडणुकांच्या काळात अधिक येत असतो. गेल्या दहा वर्षांपूर्वीचे राजकारण आणि आजचे राजकारण यामध्ये काही मूलभूत फरक आढळतो. पूर्वी आजच्या इतकी समाजमाध्यमे समाजाच्या आणि पर्यायाने राजकीय लोकांच्या हाती नव्हती. आय. टी. सेल नव्हता की प्रपोगंडा माजवणारे अनुयायी नव्हते. आय. टी. सेल नावाच्या संकल्पनेचा उदय तर उण्यापुऱ्या दहा वर्षांतला. ज्या पक्षा हा सेल प्रबल त्या पक्षाच्या दिशेने निवडणुका झुकताना दिसताहेत. आज संपूर्ण निवडणुका ह्या माध्यमांनीच आपल्या हाती घेतलेल्या दिसताहेत. समाजमाध्यमांच्या मदतीने प्रपोगंडा माजवून सत्य-असत्य इतक्या बेमालूमपणे आपल्यापुढे येते आहे की, देशाचा नागरिक म्हणून, मतदार म्हणून आपल्याला कोणताच अंदाज बांधता येत नाही. अशा भांबावलेल्या मतदाराचा आवश्यक तो फायदा राजकीय पक्ष उचलताहेत. वॉररूममध्ये बसून सातत्याने प्रतिपक्षावर डोळा देवून अजेंडा राबविला जात आहे. त्यासाठी पक्षातील काही वाचाळवीरांना हे काम दिलेले आढळते. अलीकडे गांधी, पवार आणि ठाकरे ह्या कुटुंबांवर ठरवून शाब्दिक हल्ले केले जात आहेत. हे


ISSN No. 2319-6025
Scanned with OKEN Scanner

त्याचे द्योतक आहे. या वाचाळवीरांना व इतरही राजकीय मंडळींना सातत्याने प्रसारमाध्यमांना सामोरं जावं लागत. प्रतिपक्षावर हल्लाबोल करण्याबरोबर पक्षीय भूमिका माध्यमांच्यापर्यंत पोहचविणे हे करत असताना ही मंडळी अनेक साहित्यातील दाखले आणि कविता यांचा आधार घेतात. विशेषत: निवडणुका आणि अधिवेशन काळात ह्या गोष्टी अधिक अनुभवायला मिळतात. खासदार संजय राऊत, महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार रामदास आठवले, उद्धव ठाकरे, जयंत पाटील, नरहरी झिरवाळ ही काही प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. ज्यांनी वाद आणि युक्तिवाद करण्यासाठी मराठी कवितेचा आधार घेतला आहे. याच्या जोडीला महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक घटनांचा राजकारणाशी संबंध जोडून काव्यलेखन केलेले आहे. 'मी पुन्हा येईन', हे विधान त्याचे उत्तम उदाहरण आहे. यादृष्टीने विधिमंडळ कामकाजातील अनेक कविता, रामदास आठवले यांची अर्थसंकल्पावरील प्रतिक्रियाही विचारात घेण्यासारखी आहे. या मर्यादेत आजच्या राजकीय कवितेचा विचार करावा लागतो. एकूण मराठी राजकीय कवितेचे बाबतीत पुढील निष्कर्ष नोंदविता येतील.

**निष्कर्ष**

- तत्कालिक विषय नजरेसमोर ठेवून लेखन.
- गेयता, यमकाधिष्ठित रचनाबंध.
- काव्य कमी, कारागिरी अधिक.
- अनुभव मुरवणे, मांडणीतील पूर्वपरंपरा नाकारून नवी काव्यभाषा घडवणेची क्रिया अशक्य.
- लेखनप्रभावी होण्यासाठी राजकीय घटितांचा थेट वापर.
- पूर्वीच्या राजकीय कवितेत राजकीय भान जपण्याचा प्रयत्न, हल्लीच्या कवितेत हे भान सुटलेले.
- समकालीनता महत्त्वाचा विशेष.

**संदर्भ**


१) सरगर वामन, (२०१७), कवितेची निर्मिती प्रक्रिया आणि १९९० नंतरच्या कवितेचे रूपविशेष (शिवाजी विद्यापीठाला सादर झालेला पीएच.डी. प्रबंध)

२) रसाळ सुधीर, (२००२), कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पृ.क्र. १०४.


◆◆◆

Scanned with OKEN Scanner